रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली

बुधवार, दि. १३ एप्रिल, २०२२

# मराठी विभाग व सांस्कृतिक विभाग

## महात्मा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान

## 'पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत फुले, शाहू, आंबेडकरांचे योगदान'

### अहवाल

सामाजिक न्याय विभाग व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, यांच्या परिपत्रकानुसार महात्मा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून मराठी व सांस्कृतिक विभागाच्या वतीने 'पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत फुले, शाहू, आंबेडकरांचे योगदान' या विषयावर डॉ. रामदास बोडरे यांचे व्याख्यान आयोजन करण्यात आले.

डॉ. बोडरे आपल्या मनोगतात म्हणाले, ''तरुणांनी समाजमाध्यमांवरील संदेश वाचून सुधारकांविषयी आपली मते बनविण्याऐवजी सुधारकांची चरित्रे वाचावित. जातीधर्माच्या चौकटीत समाजसुधारकांना कोंडून घोषणांमध्ये त्यांच्या कार्याला बंदिस्त करू नये. तरुणांनी स्वतंत्र बुद्धीने विचार करावा आणि तत्कालीन परिस्थितीमध्ये त्यांनी केलेल्या कार्याची चिकित्सा करावी.'' कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम लाभले होते. त्यांनी आपल्या मनोगतात आधुनिक भारताच्या वैचारिक जडणघडणीत महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी व सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. तेजस चव्हाण व प्रा. स्वाती मगदूम यांनी केले; तर आभार प्रा. बबन पाटील यांनी मानले. प्रस्तुत कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील अध्यापकांसह विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी मौलिक मार्गदर्शन केले.

**निष्पत्ती :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची ओळख पटली.

**लाभार्थी :** ७३




विभागप्रमुख
मराठी विभाग
मराठी विभाग प्रमुख,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)